दैनिक महा मेट्रो

महावितरणने एका झटक्यात फेडले १२,८०० कोटींचे कर्ज

पान ४ ▸



वर्ष ४ रे : अंक : १ पुणे, मंगळवार, १६ डिसेंबर २०२५ पाने : ४ किंमत : ३.००
RNI NO.MAHMAR2022/87390
VOL NO.4. ISSUE : 1 Pune, Tuesday, 15 December 2025 Pages : 4 PRICE : 3.00

# मतदार 'राजा' ची किंमत एक किलो 'चिकन' आणि एक प्लेट 'मिसळ'

पुणे महापालिकेचा दर वर्षाचा अर्थसंकल्प बारा हजार ते पंधरा हजार कोटी पेक्षा अधिक आहे. सत्ताधारी नगरसेवकांना दरवर्षी सरासरी दहा कोटी पेक्षा अधिक निधी मिळतो. या प्रमाणे पाच वर्षात पन्नास कोटी रूपयांचा निधी मिळतो. हा निधी आमदार व खासदारांपेक्षा अधिक आहे. नगरसेवक झाल्यानंतर शहरात सुरू असलेल्या बांधकाम व्यावसायिकांना विविध परवाने मिळवण्यासाठी रेडकार्पेट टाकणे, ते परवाने मिळवून देणे त्या बदल्यात 'लायझनिंग' या गोंडस नावाखाली कोट्यावधी रूपयांचा मलिदा खाणे, त्यानंतर सत्तेच्या माध्यमातून पुन्हा पैसा मिळवणे आणि या पैशातून पुन्हा सत्ता मिळविणे हे दृष्टचक्र सुरू राहते. मतदार ' राजा' कवडीमोल किंमतीत विकले जात आहेत.

## शहराच्या उपनगरातील प्रभागात रंगले खेळ पैठणीचे ; मतदारांना डिनर सेट, साडी, सोन्याचे दागिन्यांसह हेलिकॉप्टर राईड आणि परदेशवारीचे आमिष

दिलीप कु-हाडे ( दैनिक महा मेट्रो न्यूज नेटवर्क)

पुणे : राज्यातील विधानसभा निवडणुकीत महायुतीला लाडक्या बहिणीने तारले हे सर्वश्रुत आहे. आता स्थानिक स्वराज्य संस्थेत लाडक्या बहिणींना खूष करण्यासाठी सर्वच राजकीय पक्षांच्य इच्छुकांनी कंबर कसली आहे. इच्छुक उमेदवार प्रभागातील मतदारांना विशेषता: महिला मतदारांना खूष करण्यासाठी खेळ पैठणीचा हे कार्यक्रम घेतले जात आहेत. यासह प्रत्येक महिलेला साडी भेट दिली जात आहे ( * फक्त प्रभागातील महिलांना तेही मतदार ओळखपत्र असणे बंधनकारक ) यासह मतदारांना देवदर्शन राज्यातील धार्मिकस्थळे व परराज्यातील धार्मिक स्थळांचा समावेश आहे. उज्जैन येथील महा कालेश्वर दर्शनासाठी संपूर्ण रेल्वे आरक्षित करून मतदारांना मोफत देवदर्शनासाठी पाठविले जात आहे.



पुणे महापालिका निवडणुका २०२२ साली होणे अपेक्षित होते. सुरवातीला इतर मागासवर्ग आरक्षणाचा मुद्दा व इतर कारणांमुळे महापालिका निवडणुका लांबत गेल्या. अखेर साडेतीन ते चार वर्षानंतर न्यायालयाच्या आदेशाने निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला आहे.त्यामुळे निवडणुका लढण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी गुडघ्याला बाशिंग बांधले आहे.

वडगांव शेरी मतदारसंघात प्रभाग एक,तीन आणि चार प्रभागातील मधील इच्छुकांनी निवडणुकीत विजयी होण्यासाठी मतदारांवर भेट वस्तूंचा वर्षाव सुरू केला आहे. नवरात्री उत्सवाची संधी साधून इच्छुक उमेदवारांनी भव्य गरबा दांडिया,पैठणी साड्या , इलेक्ट्रिक वस्तूंच्या बक्षिसांची लयलूट केली. त्यामुळे या तीन प्रभागातील महिला मतदारांची अजून दिवाळी सुरू आहे. प्रभाग तीन विमाननगर लोहगाव व आणि प्रभाग चार खराडी वाघोली प्रभागातील इच्छुकांनी विशेष रेल्वे आणि बस गाड्या करून मतदारांना उज्जैन येथील महाकाल चे मोफत देवदर्शन यात्रा घडवून आले. तीन चार वेळा यात्रा घडवून आणून उमेदवारांनी कोट्यवधी रुपये खर्च करून निवडणुकीसाठी देव पाण्यात ठेवले आहे.

### या आठवड्यात निवडणुकीची आचारसंहिता

जाहीर होण्याची शक्यता आहे.ही शक्यता गृहीत धरून या तीन प्रभागातील इच्छुकांनी आता खेळ पैठणीच्या कार्यक्रमावर जोर दिला आहे.एका विद्यमान लोकप्रतिनिधींच्या कुटुंबीयाने महिला मतदारांसाठी खेळ पैठणीच्या स्पर्धेत सहभागी महिलांसाठी डिनर सेट देणार दिले . कार्यालयाच्या मुख्य आकर्षण पाच दिवसांची थायलंड कपल टूर ठेवली आहे. तसेच अकरा विजेत्यांना हेलिकॉप्टर राईड,सोन्याचे दागिने आणि आकर्षक भेट वस्तू देणार आहे.

प्रभाग एक मध्ये इच्छुक उमेदवाराने खेळ पैठणीच्या कार्यक्रमात पाच हजार पैठणी साड्या,एक दुचाकी आणि भेट वस्तूंची वाटप केले .त्यामुळे प्रतिस्पर्धी दोन उमेदवारांनी खेळ पैठणीचा कार्यक्रम आयोजित केला आहे.यामध्ये माजी नगरसेविकेने स्पर्धेत चक्क चार चाकी मोटार कार आणि पाच दुचाकी चे बक्षीस जाहीर केले आहे.भाजपच्या एका इच्छुकाने स्पर्धेत पाच दुचाकी ,टिव्ही,फ्रिज, कूलर आणि वॉशिंग मशीन असंख्य वस्तूंची लयलूट करणार आहे.



हा सर्व प्रकार लोकशाहीची थट्टा आहे. याला मतदारराजा बळी पडत आहे. याला कारणीभूत येथील भ्रष्ट व्यवस्था आहे. कोणाचा कोणावर अंकुश नाही. लोकशाहीचे चार स्तंभ ( कायदेमंडळ, प्रशासन, न्यायपालिका आणि माध्यमे हे लोकशाहीचे चार स्तंभ आहेत.) सध्या महात्मा गांधीजींच्या तीन माकडांप्रमाणे भूमिका बजावत तर नाही ना ? अशी शंका आल्या शिवाय राहत नाही .

## मेट्रोच्या माध्यमातून कोंढवा परिसर इतर भागाशी जोडणार-फडणवीस

### मुख्यमंत्र्याचे हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याचे लोकार्पण



**पुणे, दि. १५ :** कात्रज-कोंढवा मार्गाचे काम लवकरात पूर्ण करण्यात येईल, मेट्रोच्या माध्यमातून कोंढव्याचा भाग इतर भागाशी जोडण्यात येईल. शिवाजी नगर ते येवलेवाडी मेट्रोमार्गाला मान्यता, स्वारगेट ते कात्रज मेट्रोमार्ग कोंढव्यापर्यंत आणणे आणि पुरंदर विमानतळाशी जोडणारी प्रस्तावित मेट्रोच्या माध्यमातून या भागाला जोडण्यात येईल,असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री भैरवनाथ ग्रामविकास मंडळाच्यावतीने कोंढवा बु. येथे उभारण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार योगेश टिळेकर, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, चेतन तुपे, मंडळाचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.

छत्रपती शिवाजी महाराज यांनी महाराष्ट्राला स्वाभिमान शिकवला असे नमूद करून श्री. फडणवीस म्हणाले, ते एक दृष्टे नेते, राज्यकर्ते होते त्यांनी समतेचे राज्य निर्माण केले. स्त्रियांवर अन्याय, अत्याचार करणाऱ्यांना कठोरातले कठोर शिक्षा करणारे त्यांचे शासन होते. त्यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली कोंढव्याची भूमी आहे, या भूमीवर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण होत असल्याचा आनंद होत आहे. पुतळ्यामुळे कोंढवा बु. परिसरासह संपूर्ण महाराष्ट्राचे वैभव वाढले आहे.

ज्या काळात मोगलशाही, नीजामशाही, आदिलशाही असे परकीय आक्रमक मराठीभूमी, हिंदुस्थानावर आक्रमण करीत होते, त्यावेळी अनेक राजे आणि राजवाडे मुघलांचे मंडलिक म्हणून आधिपत्य स्वीकारत होते. अशा काळामध्ये जिजाऊ मासाहेबांच्या आशीर्वादाने छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य निर्माण करण्याची शपथ घेतली. अठरापगड जातीच्या नागरिकांना एकत्र करून, त्यांच्यामध्ये विजिगीषुवृत्तीचे रोपण करुन त्यांच्यामाध्यमातून हिंदवी स्वराज्य स्थापन केले. त्यानंतर छत्रपती संभाजी महाराजांनी मुघलांशी लढाई करुन स्वराज्याचे रक्षण केले. त्यानंतर ताराराणींनी झुंज कायम ठेवत मराठ्यांनी दिल्लीचे तख्तही काबीज केले. अटकेपार झेंडाही मराठ्यांनीच लावला. आम्हाला स्वाभिमान देणारे, महाराष्ट्राचा अभिमान असणारे शिवाजी महाराजांचा सिबीएससीच्या अभ्यासक्रमात २१ पानांचा जाज्वल इतिहासाचा समावेश केला आहे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

श्री. टिळेकर म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत अश्वारुढ पुतळ्याच्या लोकार्पण झाले. राज्य शासनाच्या माध्यमातून कोंढवा परिसराचा पायाभूत विकास करण्यात येत आहे, असेही श्री.टिळक म्हणाले.

## बृहन्मुंबईसह राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारीला मतदान

### एकुण २ हजार ८६९ जागांसाठी निवडणूक

बृहन्मुंबई महापालिका निवडणुकीची अधिसूचना १६ डिसेंबर तर उर्वरित सर्व २८ महापालिकांची अधिसूचना १८ डिसेंबर रोजी प्रसिद्ध होईल.बृहन्मुंबई वगळता अन्य सर्व २८ महानगरपालिकांच्या निवडणुका बहुसदस्यीय पद्धतीने होत आहेत. महापालिकेच्या निवडणुकांसाठी सुमारे २९० निवडणूक निर्णय अधिकारी आणि सुमारे ८७० सहायक निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची आवश्यकता सुमारे १ लाख ९६ हजार ६०५ इतक्या निवडणूक अधिकारी कर्मचाऱ्यांची गरज

**उमेदवारांसाठी खर्च मर्यादा**

बृहन्मुंबई आणि 'अ' वर्ग महानगरपालिका (पुणे व नागपूर)- रु. १५ लाख

'ब' वर्ग महानगरपालिका (पिंपरी-चिंचवड, नाशिक व ठाणे) - रु. १३ लाख

'क' वर्ग महानगरपालिका (कल्याण-डोंबिवली, नवी मुबई, छ. संभाजीनगर व वसई-विरार)- रु. ११ लाख

'ड' वर्ग महानगरपालिका (उर्वरित सर्व १९)- रु. ९ लाख

**महत्वाच्या तारखा**

नामनिर्देशनपत्र स्वीकारणे-
२३ डिसेंबर २०२५ ते ३० डिसेंबर २०२५

**नामनिर्देशनपत्रांची छाननी**
३१ डिसेंबर २०२५

उमेदवारी माघारीची अंतिम मुदत
०२ जानेवारी २०२६

**निवडणूक चिन्ह वाटप आणि अंतिम उमेदवारांची यादी**
०३ जानेवारी २०२६

**मतदानाचा दिनांक-**
१५ जानेवारी २०२६

**मतमोजणीचा दिनांक**
१६ जानेवारी २०२६



## कळस–धानोरी–लोहगाव प्रभागात महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

### भाजप इच्छुक उमेदवार वंदना खांदवे पाटील यांच्या वतीने 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे भव्य आयोजन

**पुणे, दि. १५ :** कळस–धानोरी–लोहगाव प्रभाग क्रमांक एकमधील भारतीय जनता पार्टीच्या इच्छुक उमेदवार वंदना संतोष खांदवे पाटील यांच्या वतीने महिलांसाठी विशेष 'होम मिनिस्टर' कार्यक्रमाचे भव्य आयोजन करण्यात आले.

हा कार्यक्रम धानोरी येथील धनेश्वर मैदानावर मोठ्या उत्साहात पार पडला.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक अनिल उर्फ बॉबी टिंगरे यांची उपस्थिती लाभली. तसेच संतोष लाला खांदवे पाटील, प्रीतम खांदवे पाटील, दत्तात्रय टिंगरे, मंगेश गोळे, बंटी म्हस्के, विशाल टिंगरे, संदीप लांडगे, दीपक बापू मोझे, माऊली पवार, मिलिंद बापू खांदवे पाटील, सुधीर काळभोर, रावसाहेब राखपसरे, आदित्य खांदवे, राजू केशरकर, रवी गणाचारी, दिलीप राखपसरे, नाना खांदवे, सूरज निंबाळकर, यशोदा केशरकर, सौ. सुरेखा राखपसरे, सौ. मीनाताई इंगुळकर, सौ. कांचन साठे, ऐश्वर्या जाधव, संगीता दांगट, अल्पना मोझे, रोहिणी पवार आदी मान्यवर उपस्थित होते परिसरातील महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.

कार्यक्रमात महिलांसाठी विविध मनोरंजक खेळ, प्रश्नोत्तरे व संवादात्मक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता कार्यक्रमाला सुमारे चार ते पाच हजार महिलांची उपस्थिती लाभली.

या उपक्रमामुळे महिलांमध्ये आनंद, उत्साह आणि सामाजिक सहभाग वाढीस लागल्याचे चित्र दिसून आले. महिला सक्षमीकरणासाठी असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असा विश्वास यावेळी आयोजकांच्या वतीने व्यक्त करण्यात आला

संपादकीय....

# कारागृहात १२५० कैद्यांना गंभीर आजार; कारागृहातच घेणार अखेरचा श्वास

लोकशाही राष्ट्रात न्यायव्यवस्था मजबूत आहे. याठिकाणी दोषीवर कारवाई होतेच. अनेकांना त्यांच्या कृत्याबद्दल नंतर पश्चाताप होता. तर अनेक कैद्यांना कारागृहात असाध्य रोगाने पछाडलेली असते. या ठिकाणी उपचारही चांगले होत नाही. ना सुटका होते अशी त्यांची अवस्था असते. कारागृह प्रशासन त्यांना वयोमानानुसार सोडावे, अशी मागणी न्यायालयात करते. त्यांची वयोमानानुसार सुटका झाली तरी कुटुंबातील नातेवाईक त्यांना स्वीकारण्यास तयार नसतात. त्यामुळे त्यांनी केलेल्या अपराधाची शिक्षा न्यायव्यवस्थाही देते आणि विधाताही देत असल्याचे वास्तव राज्यातील विविध कारागृहातील रुग्णालयात उपचार घेणाऱ्या कैद्यांकडे पाहिल्यानंतर दिसते.

सर्वोच्य न्यायालयाने नुकताच एक आदेश दिला आहे. यामध्ये देशातील कारागृहात शिक्षा पूर्ण झालेल्या कैद्यांना सुटका करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी होईल तेव्हा होईल पण सध्या राज्यातील विविध कारागृहात साडेबाराशे पेक्षा अधिक कैदी गंभीर स्वरूपाच्या आजाराने ग्रस्त आहेत. यामध्ये सिद्धदोष कैद्यांची संख्या पाचशे असून न्यायाधीन कैद्यांची संख्या सातशे पेक्षा अधिक आहे. या कैद्यांना ब्रेन टयुमर, एचआयव्ही, कर्करोग, हृदयासंबंधीचे आजार, क्षयरोग, कुष्टरोग आदी व्याधींनी ग्रासले आहेत. तर काहीजण कोमात आहेत. अशा कैद्यांचा अहवाल न्यायालयाला पाठवून किरकोळ गुन्हे असलेल्यांना मुक्तता करण्यासंदर्भात विचारणा करण्यात येणार येत असल्याची माहिती कारागृह प्रशासन करते.

राज्यातील विविध कारागृहांमध्ये सिध्ददोष आणि न्यायधीन कैद्यांची अधून-मधून आरोग्य तपासणी होत असते. यामध्ये अनेक कैद्यांना असाध्य रोग झाल्याचे निष्पन्न झाले आहे. यामध्ये आठशे कैद्यांना हृदयरोग, २८६ जणांना एचआयव्ही, सव्वाशे कैदी मुत्राशयाच्या आजाराने ग्रस्त आहेत. सोळा जण कर्करोगाचा सामना करीत आहेत. सतराजण कुष्ठरोगाने पीडित आहेत. सहा जणांना ब्रेन हॅमरेज झाल्यामुळे अचेतन अवस्थेत ते पडलेले आहेत.

राज्यातील मध्यवर्ती कारागृहात रुग्णालय असते. या रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांपासून ते मानसोपचारतज्ज्ञांपर्यंतचे डॉक्टर असतात. मात्र, या ठिकाणी कैद्यांना चांगले उपचार मिळतील याची खात्री नसते. असाध्य आजार झालेल्या कैद्यांना सरकारी रुग्णालयात पाठविले जाते. मात्र, तेथेही चांगले उपचार मिळतील याची शाश्वती नसते. त्यामुळे कैद्यांचा आजार बळावत जातो. त्यांच्यावर गंमीर गुन्हे असल्यामुळे त्यांना बाहेर सोडता ही येत नाही. सोडले तर त्यांना त्यांचे कुटुंब सुद्धा स्विकारतील याची शक्यता नसते. त्यामुळे असाध्यरोग असलेले कैदी असह्य वेदनेने कारागृहातच वास्तव्यास असतात. त्यांना बाहेर सोडण्यासाठी कारागृह प्रशासन उच्च न्यायालयाकडे मागणी केली आहे. त्यावर अद्याप निर्णय झाला नाही. त्यामुळे अशा कैद्यांचा शेवटचा श्वास सुद्धा कारागृहातच घेतील असे कारागृहातील प्रशासनातील अधिकारी यांचे म्हणणे आहे.

## राज्यातील पाचशे कैदी मानसिक आजारी

राज्यातील साधारणत: पाचशे कैदी मानसिक आजारी आहेत. 'माणुस ' समाजशील प्राणी आहे. त्यामुळे त्याला कुटुंब, नातेवाईक किंवा मित्र मंडळींपासून अर्थात समाजापासून दूर ठेवले तर त्याला मानसिक आजार होतो. राज्यातील अनेक कारागृहात गंमीर गुन्ह्यांच्या कैद्यांना अतिसुरक्षित अशा बराकीत ठेवले जाते. मध्यवर्ती कारागृहात अंडासेल आहे. या सेल मध्ये कैद्यांना एकट्याला राहावे लागते. त्यामुळे असे कैदी मानसिक आजारी होतात. त्यांना कारागृहातील मानसोपचार तज्ज्ञ उपचार करतात. त्यांना नियमित औषधोपचार घ्यावे लागतात. संगीत ऐकणे, टीव्ही पाहणे, वृत्तपत्र, पुस्तके वाचणे आवश्यक असते. मात्र, अनेक कैदी असे पर्याय निवडत नाहीत. ते आपल्या बराकीत एकटेच पडून असतात. सतत विचार करीत असतात त्यामुळे त्यांना आजार बळावतो. त्यानंतर त्यांना मनोरुग्णालयात दाखल करण्याची वेळ येते. कारागृहात प्रत्येक बराकी टीव्हीची सोय केलेली असते. यासह कारागृहात 'येरवडा प्रिझन रेडिओ' हे कम्युनिटी रेडिओ आहे. यावर कैदीच रेडिओ जॅकी असतात. ते रेडिओच्या माध्यमातून विविध कार्यक्रम सादर करीत असतात. कारागृहात मोठे सुसज्ज ग्रंथालय आहेत. यामध्ये विविध लेखकांची पुस्तके, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे आहेत. याचा कैदी पुरेपुर वापर करतात. असे असले तरी गंभीर आजारी असलेल्य कैदी रूग्णांचा मानवतेच्या दृष्कीकोनाने विचार होण्याची आवश्यकता आहे

# मापात पाप सुरूच...

## पुणे विभागात वजनमाने पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख प्राप्त

पुणे विभागात वजमापे पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख रूपये प्राप्त झाले आहे. वजनमाने व आवेष्टन वस्तू नियम भंग केलेल्या एक हजार ३५० जणांवर खटले दाखल केले आहेत. त्यांच्याकडून प्रशमन शुल्क ८६ लाख २९ हजार रूपये वसुल केल्याची माहिती वैध मापन शास्त्र विभागाचे सहनियंत्रक एस.एच. चाटे यांनी दिली. असे असले तरी अनेक ठिकाणी मापात पाप सुरूच असल्याचे दिसते. अनेक व्यापाऱ्यांनी गेल्या तीन चार वर्षांपासून इलेक्ट्रॉनिक वजन काट्यांची पडताळणी व मुद्रांकन न केल्यामुळे ग्राहकांची फवसणूक होत आहे. सकाळच्या दुधापासून ते मद्यापर्यंत, सिलेंडर मधील गॅस पासून ते किराणा मालापर्यंत अनेक वस्तू ग्राहकांना देताना मापात पाप होत असल्याचे दिसून येते. छोट्या व्यापाऱ्यांपासून ते पेट्रोल पंपापर्यंतची तपासणी वैध मापन शास्त्र विभागाने करणे बंधनकारक आहे. दरवर्षी विविध अभियाने राबवून विविध घरगुती वस्तू, पदार्थ मोजणारी यंत्रणा वजन काटे, दुधापासून ते पेट्रोल पर्यंतची मापे, गॅस सिलिंडर ते पंचतारांकीत हॉटेलमधील मद्याच्या मापात पाप करीत असल्याचे दिसून येत आहे. यासह आवेष्टीत वस्तू अधिनियमा अंतर्गत कोणतीही वस्तू व पदार्थ ग्राहकांना अचूक वजनात देणे बंधनकारक आहे. मात्र शहरातील व्यापाऱ्यांकडे असलेल्या वजन काट्यांचे गेल्या तीन ते चार वर्षांत मुद्रांकन व तपासणीच झालेली नसल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्राहकांची लूट होत असल्याचे चित्र आहे. हे वजन काटे सराफी बाजारापासून ते साखर कारखान्यातील ऊसाचे वजन करणाऱ्या काट्यांपर्यंत असू शकतात. या वजनांमध्ये फेरफार करता येतो. हे फेरफार होऊ नये, म्हणून वैध मापनशास्त्र विभागाकडून दरवर्षी या वजन काट्यांचे व वजनांचे मुद्रांकन व पडताळणी होत असते. मात्र, ही तपासणारी यंत्रणाच झोपी गेल्यामुळे ग्राहकांची लूट होत आहे. भारत व हिंदुस्तान पेट्रोलियम कंपनीसह इंडेन कंपनीचे गॅस सिलेंडर वितरक आहेत. वितरक अनेक ठिकाणी होम डिलीव्हरी करतात. मात्र त्यांच्या कर्मचाऱ्यांकडे तोलन उपकरणेच नसल्याच्या तक्रारी नागरिकांनी केल्या आहेत. त्यामुळे सिलेंडरमध्ये अचूक वजनाचे गॅस असल्याची खात्री देता येत नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर कित्येक ग्राहकांना गॅस सिलेंडर वजन करून घेतले जातात, याची माहितीच नाही. अनेक ठिकाणी महिला यावेळेस गॅस सिलेंडर लवकर संपला अशी तक्रार करतात मात्र त्यांच्या तक्रारीची दखल कोणी घेत नाही. शहरात अनेक ठिकाणी घरगुती सिलेंडरमधून लहान सिलेंडरमध्ये गॅस टाकताना गंभीर अपघाताच्या घटना घडल्या आहेत. या घटना अजूनही पुणे व पिंपरी चिंचवड उपनगरात सुरूच आहेत



पुणे विभागात वजनमापे पडताळणी व मुद्रांकन शुल्क २५ कोटी ४६ लाख रूपये प्राप्त झाले आहेत. तर वजनमाने व आवेष्टित वस्तू नियम भंग केलेल्या एक हजार ३५० जणांवर खटले दाखल केलेले आहेत. त्यांच्याकडून प्रशमन शुल्क ८६ लाख २९ हजार रूपये दंड घेतले आहे. "

- सहनियंत्रक, वैध मापन शास्त्र विभाग, पुणे

## मापात पाप करणाऱ्यांची तक्रार करा

वैधमापनशास्त्र विभागाच्या कायद्याप्रमाणे वजन व मापे, इलेक्ट्रॉनिक वजन काटे तोलन उपकरणांची तपासणी व मुद्रांकन न केल्यास त्यांच्यावर खटला दाखल होऊ शकतो. तसेच वितरकांकडे तोलन यंत्र नसल्यास त्यांच्यावर पाच हजार रूपये दंडाची कारवाई होऊ शकते. मात्र, अनेकांनी ही वजन काट्यांची व तोलन यंत्रांची पडताळणी व मुद्रांकनच करून घेतले नसल्याचे दिसून येते. गॅस सिलेंडर असो वस्तू, पदार्थ, दूध, मद्य किंवा पेट्रोल अचूक मापात व वजनात देणे बंधनकारक आहे. वैधमापन शास्त्र विभागातर्फे विशेष अभियान घेऊन व्यापाऱ्यांकडील व वितरकांकडील वजन काट्यांची, मापांची व तोलन यंत्राची तपासणी केली जाते. वस्तू, पदार्थ, इतर वस्तू मापात व वजन करून न दिल्यास ग्राहकांनी नियंत्रण कक्ष ०२२-२२६२२०२२ व ०२०-२६६८३१ या दूरध्वनी क्रमाकांवर व Aclmpune@yahoo.in, Dycmpune@yahoo.in या मेलवर तक्रारी करण्याचे आवाहान वैधमापन शास्त्र विभागाने केले आहे.

# बीएसआय' वे एक लाख १२ हजार वनस्पतींच्या (हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन

## एकही रूपया खर्च न करता सहा महिन्यात विद्यार्थ्यांनी सरकारचे एक कोटी ६८ लाख रूपयांची केली बचत



महाराष्ट्र , गोवा व कर्नाटक या तीन राज्यातील तब्बल एक लाख १२ हजार वनस्पतींचे ( हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. एक ही रूपया खर्च न करता विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी सहा महिन्यात हे संकलन केल्याची माहिती भारतीय वनस्पती सर्वेक्षण ( बॉटनिकल सर्वे ऑफ इंडिया) अर्थात बीएसआयचे प्रभारी अधिकारी डॉ ए बेंनियामिन यांनी सागितले.

भारतात वनस्पतींचे असंख्य नमुने आढळतात. यातील अनेक नमुन्यांचा अजून शोध सुरूच आहेत. ' बीएसआय'ने महाराष्ट्र ? गोवा व कर्नाटक राज्यातील सह्याद्री पर्वत रांगेत , महाबळेश्वर, कोकण भागात अनेक दुर्मिळ वनस्पतीच्या नमुन्यांचे संकलन केले आहे. पुणे येथील बीएसआयने एक लाख १२ हजार वनस्पतींच्या ( हर्बेरियम) संकलन केले आहे. या अमूल्य ठेव्याचे डिजिटायझेशन करणे आवश्यक होते. त्यासाठी पुणे शहरातील महाविद्यालयातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना आवाहान केले होते. याला विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद दिला.

विद्यार्थ्यांनी संगणकाच्या मदतीने प्रत्येक वनस्पतीचे छायाचित्रांसह माहितीची नोंद केली गेली. प्रत्येक बॅचमध्ये वीस विद्यार्थ्यांनी सोमवार ते शुक्रवार दरम्यान वनस्पतींचे डिजिटायझेशन केले.

डिझिटायझेशनचे काम जर खासगी संस्थेला दिले असते तर त्यांनी एका वनस्पतीचे डिजिटायझेशनसाठी दीडशे रूपये दर आकारला असता. त्यामुळे एक लाख १२ हजार वनस्पतीचे एक कोटी ६८ लाख रूपये खर्च झाले असते. मात्र, विद्यार्थ्याच्या उस्फूर्त प्रतिसादामुळे एकही रूपया खर्च करता आले नाही. सरकारचे पैसे ही वाचले व विद्यार्थ्यांना वनस्पतींचा समृध्द खजीना अनुभवता आला. याचा उपयोग विद्यार्थ्यांना भविष्यात संशोधनासाठी होऊ शकतो, असे डॉ बेनियामिन यांनी सांगितले.

महाराष्ट्र, गौवा आणि कर्नाटक विविध वनस्पतींनी समृध्द आहे. यातील अनेक वनस्पती दुर्मिळ आहेत. संशोधक आजही नवनवीन वनस्पतींच्या शोधात आहेत. भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे असलेल्या एक लाख १२ हजार वनस्पती ( हर्बेरियम) नमुन्यांचे डिजिटायझेशन केले आहे. त्यामुळे पुढील कित्येक शतकानंतरही वनस्पतींची संपुर्ण माहिती एक क्लिकमध्ये मिळू शकते." भारतीय वनस्पती सर्वेक्षणकडे महाराष्ट्रातीस अतिदुर्मिळ वनस्पतीचे नमुने संग्रहित आहेत. प्रत्येक वनस्पतीचे नमुने सुरक्षित लॉकरमध्यो ठेवण्यात आले आहेत. त्यामुळे लुप्त झालेल्या वनस्पतीचे नमुने सुद्धा या ठिकाणी पाहण्यास मिळतात.

- लेखक- डॉ. ए.बेनियामिन, प्रभारी अधिकारी , भारतीय वनस्पती सर्वेक्षण

# औद्योगिक कंपन्यांनी नवीन कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी - ॲड.आदित्य जोशी

**पुणे, दि. १५ :** औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाने कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी असे आवाहन एडवोकेट आदित्य जोशी यांनी केले.







यशस्वी स्किल्स लिमिटेडच्या पुढाकाराने गोखले इन्स्टिट्यूटच्या काळे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या 'नवीन कामगार कायदे समजून घेताना' या विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी नवीन कामगार कायद्यांमधून उद्भवणाऱ्या कायदेशीर प्रश्नांची सोप्या भाषेत मांडणी कंपनीतील व्यवस्थापक व अधिकारी यांना एडवोकेट आदित्य जोशी आणि एडवोकेट वरुण जोशी यांनी केली. यावेळी बोलताना दोन्ही वक्त्यांनी सांगितले की,नवीन कामगार कायद्यांमध्ये कामगार संघटनांना स्पष्ट अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. कंपनी व्यवस्थापनाने कामगारांच्या सेवाशर्ती, वेतनवाढीचे करार इत्यादी विषयांवर चर्चा करताना कामगार संघटनांशी संवाद साधणे आणि चर्चेच्या माध्यमातून करार करणे हा या कायद्यांचा मूलभूत उद्देश आहे.

नवीन कामगार कायद्यानुसार वेतनाची व्याख्या बदलल्यानुसार ग्रॅच्युटीच्या रकमेत होणारा संभाव्य बदल लक्षात घेता औद्योगिक कंपन्यांच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाने योग्य ती आर्थिक तरतूद करणे गरजेचे आहे असेही त्यांनी त्यांच्या मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमात वेतन संरचना करार, कामगार विषयक मुद्दे, तसेच औद्योगिक आस्थापनातील मुख्य (core) व गौण (non-core) क्रियाकलापांचे व्यवस्थापन या संदर्भात सविस्तर चर्चा झाली. नवीन कायद्याच्या योग्य व संतुलित वेतन संरचना कशी ठेवावी, याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

आदित्य जोशी आणि वरुण जोशी यांनी प्रतिपादन केले की, औद्योगिक आस्थापनांनी सकारात्मक दृष्टिकोन ठेवून नवीन कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करावी. यामुळे व्यवस्थापन आणि कामगार यांच्यातील संबंध अधिक सुदृढ होतील आणि औद्योगिक शांतता प्रस्थापित होईल.

या कार्यक्रमाला एडवोकेट मीनल जोशी, एडवोकेट श्रुती वरूण जोशी,एडवोकेट मनोज सूर्यवंशी, एडवोकेट अक्षया कुलकर्णी आणि एडवोकेट सानिका गोखले यांच्यासह पुणे, पिंपरी चिंचवड, चाकण, तळेगाव, हिंजवडी, रांजणगाव आदी भागातील विविध नामांकित कंपन्यांचे मनुष्यबळ व्यवस्थापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे महापालिका हद्दीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी विभागीय आयुक्तांच्या अध्यक्षेखाली समिती नेमणार - मंत्री डॉ.उदय सामंत

**नागपूर, दि. १५ :** पुणे महापालिका हद्दीतील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी मुख्य सचिव यांच्या अध्यक्षेखाली समिती आहे. मात्र लोकप्रतिनिधीच्या मागणीनुसार विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापण्यात येईल, असे मंत्री डॉ.उदय सामंत यांनी सांगितले.



पुणे महापालिका हद्दीतील वाहतूक कोंडीबाबत सदस्य भीमराव तापकीर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर मंत्री डॉ. सामंत बोलत होते.

मंत्री डॉ. सामंत म्हणाले की, पुणे महापालिका क्षेत्रातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वाहतूक नियोजन विभाग आणि ट्रॅफिक प्लॅनर नेमण्यासंदर्भात विचार करण्यात येईल. तसेच ही वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी नेमण्यात येणाऱ्या समितीमध्ये लोकप्रतिनिधींचा समावेश करण्यात येईल.

# राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये आकृतीबंधानुसार पदभरती करणार - कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

**नागपूर, दि. १५ :** राज्यातील कृषी विद्यापीठांमध्ये आकृतीबंधानुसार पदभरती करणार असून वित्त विभागाकडे पाठपुरावा करून लवकर भरती प्रक्रिया राबविण्यात येणार असल्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

सदस्य सतिश चव्हाण यांनी कृषी विद्यापीठांमध्ये मनुष्यबळाविषयी लक्षवेधी सूचना मांडली होती. लक्षवेधी सूचनेला उत्तर देताना मंत्री दत्तात्रय भरणे आणि राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल बोलत होते. यावेळी सदस्य अमोल मिटकरी आणि सदाभाऊ खोत यांनी चर्चेत सहभाग घेतला.

सेवाप्रवेश मंडळाचा तात्पुरता कार्यभार उपाध्यक्ष (एमसीआरसी) यांना तत्काळ सोपविण्यात येणार आहे, ज्यामुळे प्रमोशन विषयक प्रक्रिया अधिक वेगाने नियंत्रित होईल. पुढील अधिवेशनात हा विषय पुन्हा उपस्थित करण्याची गरज भासणार नाही, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे – ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडन्स पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे–४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०–४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
TC. MAHMAR51691 NO.SDM/PUNE/SR/56/2022 MAHA METRO This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# पिंपरी चिंचवड महापालिकेकडून निरगुडी गावाला पाणीपुरवठा होणार; आमदार बापूसाहेब पठारे

**पुणे, दि. १५ :** मौजे निरगुडी गावातील दूषित पाणीपुरवठ्यामुळे निर्माण झालेल्या गंभीर आरोग्य समस्यांच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमार्फत नळजोड मंजूर करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामागे वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी केलेला सातत्यपूर्ण पाठपुरावा निर्णायक ठरला आहे.

निरगुडी गावाचा पाणीपुरवठा करणारी सार्वजनिक विहीर इंद्रायणी नदीलगत असून जवळच असलेल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सुमारे २१ दशलक्ष लिटर मैलाशुद्धीकरण केंद्रातून झिरपणाऱ्या पाण्यामुळे विहिरीतील पाणी अत्यंत दूषित झाले होते. आरोग्य विभागाकडून ग्रामपंचायतीला लाल कार्ड देण्यात आले होते. या गंभीर बाबी लक्षात घेऊन आमदार बापूसाहेब पठारे यांनी हा प्रश्न महापालिका, विधानमंडळात व शासन पातळीवर सातत्याने मांडला.

त्यांच्या प्रयत्नांतून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सभेतील ठरावानुसार निरगुडी गावासाठी १०० मिमी (४ इंच) व्यासाचे नळजोड मंजूर करण्यात आले आहे. पाण्याचा दर प्रति हजार लिटर नऊ इतका राहणार असून दरवर्षी पाच टक्के दरवाढ लागू राहील. पाण्याचा मीटर ग्रामपंचायतीने स्वखर्चाने बसवणे, मासिक पाणीदेयके वेळेत भरणे तसेच मीटरची देखभाल करण्याची जबाबदारीही ग्रामपंचायतीची राहणार आहे. पाणीपुरवठा हा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेकडे उपलब्ध असलेल्या पाण्यावर अवलंबून राहील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.

भामा-आसखेड आणि आंध्र प्रकल्प पूर्ण होईपर्यंत तात्पुरत्या स्वरूपात टँकरद्वारे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याची तरतूद करण्यात आली आहे. या निर्णयामुळे निरगुडी गावातील नागरिकांना स्वच्छ व सुरक्षित पाणी मिळणार आहे. आमदार बापूसाहेब पठारे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रश्न मार्गी लागला असून नागरिक त्यांच्या या प्रयत्नांची प्रशंसा करत आहेत.

# दिव्यांगांच्या विविध प्रश्नांसंबंधी आमदार बापूसाहेब पठारे आग्रही



**नागपूर, दि. १५ :** हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी प्रश्नोत्तर सत्रात राज्यातील दिव्यांग नागरिकांच्या हितासंबंधी महत्त्वाचे प्रश्न उपस्थित केले. दिव्यांगांच्या बाबतीत घडणाऱ्या घटनांना आळा घालण्यासाठी शासन ठोस नियमावली तयार करणार का, बनावट दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे लाभ घेतल्याने खऱ्या दिव्यांगांचे नुकसान होत असल्यावर काय उपाययोजना केल्या जाणार तसेच प्रमाणपत्रासाठी अर्ज करूनही अनेकांना दीर्घकाळ प्रतीक्षा करावी लागत असल्याने तातडीने प्रमाणपत्र मिळण्यासाठी कोणती कार्यवाही होणार, असे प्रश्न त्यांनी मांडले. प्रश्नांना उत्तर देताना मंत्री अतुल सावे यांनी युनिक डिसेबिलिटी आयडेंटिफिकेशन (यूडीआयडी) कार्ड सर्वांसाठी बंधनकारक करण्यात आल्याचे स्पष्ट केले. बनावट दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. केंद्र शासनाच्या आदेशानुसार जानेवारी अखेरीस सर्व विभागांनी यूडीआयडी कार्ड शिवाय कोणताही लाभ देऊ नये. याशिवाय किमान ४० टक्के दिव्यांगत्वाची अट लागू असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच दिव्यांग प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासकीय रुग्णालयांनी किमान दोन दिवस ठेवण्याच्या सूचना देण्यात येणार असल्याचे सांगितले. दिव्यांग बांधवांना आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवणार असल्याचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी यावेळी सांगितले.

# लोहगावसह समाविष्ट गावांच्या विकास आराखड्यातील त्रुटींवर आमदार बापूसाहेब पठारे आक्रमक

**नागपूर दि. १५ :** हिवाळी अधिवेशनाच्या पाचव्या दिवशी वडगावशेरी मतदारसंघाचे आमदार बापूसाहेब पठारे यांनी पुणे महापालिकेत २०१७ मध्ये समाविष्ट झालेल्या लोहगावसह ११ गावांच्या विकास आराखड्यातील गंभीर त्रुटींवर सभागृहाचे लक्ष वेधले. लक्षवेधी सूचनेद्वारे त्यांनी नागरिकांना भेडसावणाऱ्या व्यावहारिक समस्यांची ठोस मांडणी करत विकास आराखड्याचा पुनर्विचार करण्याची मागणी केली.

लोहगावमध्ये नागरिकांच्या घरांवरून रस्ते प्रस्तावित करण्यात आले आहेत. लोहगाव येथील मोझेनगर, साठे वस्ती, पठारे वस्ती, गणेश पार्क काळभोर वस्ती, पवार वस्ती, निर्मिती पार्क, ब्लू स्काय, डिफेन्स कॉलनी, ग्रीन पार्क, तसेच स.न. ९५ व इतर सर्व्हेनंबरमधून ३६ मीटर रुंदीचा रस्ता काढताना ३०० मीटरवर मोकळी जागा असूनही नागरी वस्तीतून मार्ग आखण्यात आला आहे. पुणे-अहिल्यानगर महामार्गावर खराडी जकात नाक्यापासून २०० मीटरवर ३६ मीटरचा प्रस्तावित रस्ता करून दोन मोठे चौक तयार होणार असून वाहतूक कोंडी वाढण्याची शक्यता आहे. स.न. १३४ आणि पोरवाल रोड स.न. २९६ मध्ये प्रत्यक्ष वास्तव्यास असलेल्या नागरिकांच्या घरांकडे दुर्लक्ष करून कमर्शियल, ग्रीन झोन प्रस्तावित करण्यात आल्याचेही पठारे यांनी निदर्शनास आणून दिले. अल्पभूधारक शेतकऱ्यांवर आरक्षणांचा वाढता भार, एकाच व्यक्तीच्या जागेवर दोन पेक्षा जास्त आरक्षणे, ज्याची जागा जात असेल अशा बाधित व्यक्तींना मोबदला द्यावा, मोठ्या बांधकाम व्यावसायिकांच्या भूखंडांवर आरक्षण टाळल्याची शक्यता, आणि कार्यालयीन नकाशांवरून आराखडा तयार करताना प्रत्यक्ष पाहणीच न केल्याचा मुद्दाही त्यांनी ठळकपणे मांडला.

यावर मंत्री उदय सामंत यांनी स्पष्ट केले, की "प्रारूप विकास आराखड्यावर आलेल्या सर्व हरकती आणि सूचना नियमांनुसार ऐकल्या जातील. नियोजन समितीसमोर नागरिकांना प्रत्यक्ष सुनावणीची संधी दिली जाईल आणि आवश्यक फेरबदल करूनच अंतिम आराखड्याला मंजुरी दिली जाईल. कोणत्याही नागरिकाचे घर अथवा अल्पभूधारक शेतकऱ्यांची जमीन अन्यायकारकरीत्या बाधित होणार नाही. तसेच प्रस्तावित रस्त्यांमध्ये प्रत्यक्ष परिस्थितीनुसार सुधारणा करण्यात येईल." प्रारूप आराखड्याची सविस्तर तांत्रिक छाननी नगररचना विभागाकडून होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. आमदार बापूसाहेब पठारे यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर शासन गांभीर्याने कार्यवाही करणार असल्याचे संकेत मिळाले आहेत. विकास आराखड्यातील त्रुटी दूर करण्यासाठी आणि नागरिकांच्या हिताचे नियोजन सुनिश्चित करण्यासाठी येणारे टप्पे महत्त्वाचे ठरणार आहेत.

# मातंग समाजाच्या आरक्षणासाठी मुंबई ते नागपूर पायी महापदयात्रा नागपूरात

- मातंग समाजाच्या मुंबई ते नागपूर पदयात्रेचे नागपूरात महामोर्च्यात रूपांतर
- मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण न दिल्यास राज्यभर तीव्र आंदोलन - विष्णुभाऊ कसबे

**नागपूर, दि. १५ :** मातंग समाजाला स्वतंत्र आरक्षण मिळावे,अनुसूचित जाती उपवर्गीकरण (अ-ब-क-ड) लागू करणे तसेच मातंग समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी मुंबई ते नागपूर पायी पदयात्रा लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुभाऊ कसबे यांच्या नेतृत्वात सुरू असून आज त्याचे नागपूर शहरात महामोर्च्यात रूपांतर झाले .समूर्ण महाराष्ट्रभर ठिकठिकाणी या पदयात्राचे स्वागत मातंग समाज करीत या पदयत्रेत सहभागी झाले होते .आज नागपूर मध्ये दाखल होऊन यशवंत स्टेडियम ते विधानभवन असा हजारो लोकांचा महामोर्चा काढण्यात आला . समाजाने अतिशय उत्स्फूर्त असे स्वागत करून या पदयात्रेला पाठिंबा देत लोक मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते .

गेल्या कित्येक वर्षांपासून मातंग समाज हा दुर्लक्षित राहिला आहे .सामाजिक ,आर्थिक ,शैक्षणिक ,राजकीय दृष्ट्याही हा समाज काय दुर्लक्षित केला जातो .आज या समाजाचा एकही आय ए एस अधिकारी नाही राजकीय दृष्ट्याही या समाजाला संधी मिळू दिली जात नाही .असा हा समाज मुख्य प्रवाहात आणायचा असेल तर आरक्षणाची वर्गवारी झाली पाहिजे आमचा हक्क आम्हाला मिळाला पाहिजे .आणि तो फक्त स्वतंत्र्य आरक्षणाने मिळू शकतो आणि त्यासाठीच आज आम्ही मुंबई ते नागपूर पायी पदयात्रा काढून शासनाचे लक्ष वेधत आहोत. ही पदयात्रा सुमारे 14 जिल्ह्यातून गावागावातून आणि शहरातून आली आहे .आमच्या मागण्या पूर्ण झाल्या नाही तर राज्यभर तीव्र आंदोलन करण्याचा इशारा लहुजी शक्ति सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णुभाऊ कसबे यांनी या वेळी दिला आहे .

महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जाती घटकांमध्ये उपवर्गीकरण (अ-ब-क-ड) न झाल्यामुळे समाजामध्ये मोठ्या प्रमाणावर अन्याय, भेदभाव व असंतोष निर्माण झाला आहे. देशाच्या सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १ ऑगस्ट २०२४ रोजी दिलेल्या ऐतिहासिक निर्णयानुसार भारत देशातील अनेक राज्यांमध्ये अनुसूचित जाती आरक्षणाची वर्गीकरण करून समाजाला न्याय देण्याचे काम केले परंतु आपल्या महाराष्ट्र राज्यामध्ये अनुसूचित जाती उपवर्गीकरण लागू करण्याचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने राज्य शासनाला प्रदान केले आहेत. तरी सुद्धा आपण फक्त पटना उच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश अनंत बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली आहे तथापि, महाराष्ट्र राज्यात याची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. त्यामुळे, अनुसूचित जातीची आरक्षण अ ब क ड वर्गवारीची व इतर खालील प्रमाणे मातंग समाजाच्या पुढील न्याय्य मागण्या शासनाकडे सादर करणार आहोत .

१) सर्वोच्च न्यायालयाच्या १ ऑगस्ट २०२४ च्या निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून अनुसूचित जातीतील १३% आरक्षणाचे अ-ब-क-ड उपवर्गीकरण लागू करावे. न्यायमूर्ती अनंत बदर समितीचा अहवाल तात्काळ स्वीकारावा.



२) महाराष्ट्र राज्यातील मातंग समाजावरील वाढत्या अन्याय-अत्याचाराला आळा बसण्यासाठी कठोर उपाययोजना कराव्यात. अनुसूचित जाती प्रतिबंध कायद्यान्वये दाखल गुन्हे जलदगती न्यायालयात चालवून आरोपींवर कठोर कारवाई करावी.

३) क्रांतीवीर लहुजी वस्ताद साळवे अभ्यास आयोगाच्या शिफारशींची तात्काळ अंमलबजावणी करण्यात यावी.

४) साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. आण्णाभाऊ साठे यांना "भारतरत्न" पुरस्कार जाहीर करण्यात यावा.

५) साहित्यरत्न डॉ. आण्णाभाऊ साठे विकास महामंडळासाठी १००० कोटी रुपयांचे भागभांडवल उपलब्ध करून महामंडळ तात्काळ सुरु करण्यात यावे.

६) मातंग समाजासाठी स्वतंत्र घरकुल योजनेचे उद्दिष्ट देऊन घरकुलाचे अनुदान रु. ५ लाख करण्यात यावे.

७) आद्यक्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या नावाने "राष्ट्रीय खेळ प्रोत्साहन पुरस्कार" शासनाकडून जाहीर करण्यात यावा.

८) भूमिहीन अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी असलेल्या पद्मश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमानी योजनेतील जाचक अटी रद्द करून अनुदान वाढवावे. जिरायती जमिनीकरिता २५ लाख व बागायती जमिनीकरिता ३५ लाख एकरी देण्यात यावे.

९) अनुसूचित जाती व नव बुद्ध घटकांचा विकास करणे याच्या अंतर्गत मातंग वस्तीमध्ये आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांच्या नावाने तालीम उभारण्यासाठी विशेष तरतूद करण्यात यावी.

१०) आद्य क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे यांचे नाव महापुरुषांच्या यादीत समाविष्ट करण्यात यावे

वरील सर्व मागण्या मातंग समाजाच्या न्याय, अस्तित्व, सामाजिक प्रगती आणि आर्थिक सक्षमीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहेत. त्या अनुषंगाने आपण माननीय मुख्यमंत्री म्हणून तात्काळ सकारात्मक निर्णय घेऊन शासनस्तरीय आदेश जारी करावेत, अशा मागण्या महाराष्ट्र शासनाला करण्यात आल्या.

या पदयात्रेचे व महामोर्च्याचे आयोजन लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य च्या वतीने करण्यात आल होते . मुंबई ते नागपूर महापदयात्रेचा आज महामोर्चात रूपांतर झाल महापदयात्रेचे प्रमुख नेतृत्व लहुजी शक्ती सेनेचे संस्थापक अध्यक्ष विष्णु भाऊ कसबे करीत होते .यावेळी प्रदेशाध्यक्ष कैलास दादा खंदारे,नितीन भाऊ वायदंडे,नितीन भाऊ दोडके,अनिल हातागळे अनिकेत भाऊ हजारे,शंकर भाऊ तायडे,किरण भाऊ थोरात,रमीज भाई सय्यद,आबा सरोदे,राहुल पाटोळे,अनिल कुमार कांबळे,हेमंत दाभाडे,श्रीनिवास मदिगा,आकाश बनसोडे,गणेश ताटे,तातेराव गोमतकर,शुभम खडसे आदि प्रमुख पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते राज्यभरातून सहभागी झाले होते

# 'बॉम्बे नाही, मुंबईच' हीच राज्य शासनाची ठाम भूमिका – मंत्री ॲड.आशिष शेलार

**मुंबई, दि. १५ :** 'बॉम्बे नाही, मुंबईच' या मुद्द्यावर महाराष्ट्र शासनाची भूमिका अत्यंत स्पष्ट, अधिकृत आणि ठाम असल्याचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी विधानपरिषदेत सांगितले. हीच भूमिका यापूर्वी मांडण्यात आली असून, यापुढेही तीच सातत्याने मांडली जाईल, असे त्यांनी सांगितले.

केंद्रीय मंत्री यांनी आयआयटी बॉम्बेच्या नावाबाबत केलेल्या विधानावर विधानपरिषद सदस्य ॲड.अनिल परब यांनी उपस्थित केलेल्या मुद्यावर उत्तर देताना मंत्री ॲड. शेलार बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र सरकारला पत्र पाठवले असून, राज्याची भूमिका केंद्र सरकारपर्यंत पोहोचवण्यात आली आहे. मुंबईच्या नावासंदर्भात कोणताही संभ्रम नसून, राज्य शासन 'मुंबई' या नावालाच प्राधान्य देत असल्याचे मंत्री ॲड.शेलार यांनी सांगितले.

# आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी गैरव्यवहार; वसुलीची कार्यवाही सुरू - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**नागपूर, दि. १५ :**आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि. नागपूर (अवसायनात) या पतसंस्थेतील आर्थिक गैरव्यवहाराच्या वसुलीची कार्यवाही सुरू असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधानपरिषदेत दिली.

सदस्य डॉ.परिणय फुके यांनी या विषयी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य प्रसाद लाड यांनी सहभाग घेतला.

सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले, आनंदसाई अर्बन को ऑप क्रेडिट सोसायटी लि. नागपूर (अवसायनात) या संस्थेच्या २५ अपचारी यांच्या विरुद्ध सहकार आयुक्त पुणे यांनी १० कोटी ७३ लाख ४ हजार ९६९ रुपये ची वसुली निर्गमित केली आहे. ही रक्कम वसुल करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था नागपूर यांच्यामार्फत विशेष वसुली व विक्री अधिकारी नागपूर जिल्हा पतसंस्था व कर्मचारी पतसंस्था सहकारी संघ मर्यादित नागपूर यांची नियुक्ती केली आहे.

# बेवारटोला प्रकल्पाची कामे जून २०२६ पर्यंत पूर्ण करणार - जलसंपदा मंत्री गिरीश महाजन

**नागपूर, दि. १५ :** गोंदिया जिल्ह्यातील बेवारटोला (ता. साकोली) लघु सिंचन प्रकल्पाची उर्वरित कामे जून २०२६ पर्यंत पूर्ण केली जातील, असे जलसंपदा ( विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास) व आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी विधान परिषदेत सांगितले. सदस्य डॉ. परिणय फुके यांनी बेवारटोला (जि. गोंदिया ता. साकोली) धरण प्रकल्पांतर्गत कालव्याची कामे अपूर्ण अवस्थेत असल्याबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

जलसंपदा मंत्री महाजन यांनी या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना सांगितले, या प्रकल्पाची प्रकल्पीय सिंचन क्षमता १३१० हेक्टर असून त्यापैकी ९९५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण झाली आहे उर्वरित ३१५ हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्यासाठी डाव्या कालव्यावरील टोयागोंदी, चांदसूरज आणि कोपालगड कालव्यांची कामे प्रगतीपथावर आहेत. ही कामे जून २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित असल्याचेही त्यांनी सांगितले.

# श्रृंखला उपहारगृहातील बंदीजणांना ब्लॅंकेटचे वाटप खुल्या कारागृहातील बंद्यांचे थंडी पासून संरक्षण

**येरवडा, दि. १५ :** शहरात थंडी वाढत आहे. त्यामुळे थंडीपासून बचाव करण्यासाठी स्वेटर, कानटोपी, जॅकेट यासह ब्लॅंकेट घेण्यासाठी नागरिकांची गर्दी बाजारपेठेत दिसू लागली आहे. मात्र कारागृहातील तेही खुल्या कारागृहातील श्रृंखला उपहारगृहातील बंद्यांना थंडीपासून संरक्षण करण्यासाठी त्यांच्याकडील अंथरूण व पांघरूण पुरेसे नव्हते. ते थंडीपासून बचाव करण्यासाठी विविध उपाययोजना करीत मात्र त्याचा काही उपयोग होत नव्हता. ही परिस्थिती उपहारगृह आलेल्या एका उद्योजकाला दिसली. त्यांनी खुल्या कारागृहाचे अधिक्षक यांची परवानगी घेऊन उपहारगृहात काम करणाऱ्या सर्व बंद्यांना ब्लॅंकेट भेट म्हणून दिले. कैद्यांची सुधारणा व पुनर्वसन अंतर्गत येरवडा खुल्या कारागृहाच्या वतीने गेली तीन वर्षापासून कॉमरझोन या माहिती व तंत्रज्ञान कंपनीसमोर 'श्रृंखला उपहारगृह ' सुरू आहे. या उपहारगृहात ४५ बंदी काम करीत आहेत. या उपहारगृहात काम करणा-यांना पहाटे लवकर उठून तयारी करावी लागते. त्यासाठी ते उपहारगृहाच्या शेड मध्ये व शेजारी असलेल्या काही खोल्यांमध्ये बंदीजण राहतात. सध्या थंडी वाढत असल्यामुळे बंदीजण थंडीपासून बचाव करण्यासाठी विविध उपाययोजना करीत असल्याचे व उपहारगृहात अधूनमधून येणारे ग्राहक व उद्योजक सुधिर वाघमोडे यांच्या निदर्शनास आले. त्यांनी तत्काळ येरवडा खुल्या कारागृहाचे अधिक्षक रमाकांत शेडगे यांना पत्राद्वारे श्रृंखला उपहारगृहातील बंदीजणांना ब्लॅंकेट वाटण्याची इच्छा व्यक्त केली. अधिक्षक शेडगे यांनी त्यांचे स्वागत



करून परवानी तर दिलीच यासह त्या कार्यक्रमाला उपस्थिती ही दिली. यावेळी वाघमोडे म्हणाले," सामाजिक उत्तरदायित्व म्हणून बंदीजणांना ब्लॅंकेटचे वाटप केले. यासह खुल्या कारागृहाला लागणा-या मूलभूत सोई सुविधा खासगी कंपनीच्या सीएसआर त्या माध्यमातून मिळवून देण्याचा प्रयत्न करणार आहे." अधिक्षक शेडगे म्हणाले , " खुल्या कारागृहातील बंदीजणांना विविध कौशल्ये देऊन त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात सोडले जात आहे. त्यांना समाजाने स्वीकारले तर ते सुद्धा चांगले जीवन जगू शकतात. पोलीस, न्यायालयात व कारागृह यामध्ये कारागृहाची भूमिका ही बंद्यांची सुधारणा व पुनर्वसनाची असल्यामुळे ती महत्वाची आहे. " यावेळी तुरुंगाधिकारी हेमंत पाटील, श्रृंखला उपहारगृहाचे व्यवस्थापक अविनाश पवार व बंदीजण उपस्थित होते.

# सोयाबीन, कडधान्ये, डाळींच्या खरेदीसाठी ५९० खरेदी केंद्रे - पणन मंत्री जयकुमार रावल

**नागपूर, दि. १५ :**सोयाबीन, कडधान्ये आणि डाळींच्या खरेदीसाठी किमान आधारभूत किंमत योजनेंतर्गत (एमएसपी) केंद्र सरकारच्या माध्यमातून सुमारे ५९० खरेदी केंद्रे सुरू करण्यात आली आहेत, अशी माहिती पणन मंत्री जयकुमार रावल यांनी विधान परिषदेत दिली.

सदस्य अमोल मिटकरी यांनी शेतकऱ्यांच्या तूर व उडीद डाळीस हमीभाव मिळत नसल्याबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य राजेश राठोड यांनीही सहभाग घेतला.

पणन मंत्री रावल यांनी सांगितले, शेतकऱ्यांच्या कृषी मालाला चांगला भाव मिळावा, त्याला त्याच्या शेत मालाची विनासायास विक्री करता यावी यासाठी किमान आधारभूत योजनेंतर्गत सुरू केलेल्या केंद्रावरून शेतकऱ्यांचा माल परत जाणार नाही याची दक्षता घेतली जाईल. याबाबत हमी भाव केंद्रांना सूचना देण्यात येतील. तसेच किमान आधारभूत किंमतीद्वारे शेतकऱ्यांना योग्य दर मिळावा आणि प्राईस स्टॅबिलायझेशन स्कीमद्वारे ग्राहकांवर होणारा परिणाम कमी व्हावा यासाठी केंद्र व राज्य शासन संतुलन राखून काम करत असल्याचेही पणन मंत्री रावल यांनी सांगितले.

राज्यात कापूस खरेदीसाठी यावर्षी १६८ केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. यापैकी १५६ केंद्रे कार्यान्वित झाली आहेत. या केंद्रांवर ६ लाख ८३ हजार शेतकऱ्यांनी नोंदणी केली आहे. आतापर्यंत सुमारे २९ लाख क्विंटल कापसाची खरेदी करण्यात आली आहे. यासाठी जवळपास २३०० कोटी रक्कम खर्च करण्यात आल्याची माहितीही पणन मंत्री रावल यांनी या प्रश्नाच्या उत्तरात दिली.

# उपसा जल सिंचन योजनांच्या थकीत कर्जाबाबत मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव सादर करणार - सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**नागपूर, दि. १५ :** राज्यातील उपसा जल सिंचन योजनांच्या थकीत कर्जाबाबत मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव सादर केला जाईल, असे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य डॉ. परिणय फुके यांनी राज्यातील २६१ सहकारी उपसा जल सिंचन संस्थांच्या योजनांच्या थकीत कर्ज माफीबाबत प्रश्न उपस्थित केला होता.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना सांगितले, राज्यातील उपसा जलसिंचन संस्थांच्या थकीत कर्जाच्या जप्तीची कार्यवाही तूर्तास करू नये असे संबंधित बँकांना कळविण्यात आले आहे. राज्यातील उपसा जलसिंचन संस्थांचे थकीत कर्ज व व्याजाची सुमारे ४०० कोटीची रक्कम होत असून याबाबत निर्णयासाठी मंत्रिमंडळ बैठकीत प्रस्ताव सादर केला जाईल, असेही सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले.

# पनवेल, नवी मुंबई परिसरातील सिडकोच्या घरांच्या दर्जाबाबत चौकशी करू - नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ

**नागपूर, दि. १५ :** पनवेल, नवी मुंबई परिसरात सिडकोमार्फत बांधण्यात येणाऱ्या घरांचा दर्जा चांगला आहे. तरीही या घरांच्या दर्जाबाबत सदस्यांनी केलेली सूचना तसेच या बाबत तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची चौकशी केली जाईल, असे नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी विधान परिषदेत सांगितले.

सदस्य विक्रांत पाटील यांनी यासंदर्भात विधान परिषदेत नियम ९७ अन्वये अल्पकालीन चर्चा उपस्थित केली होती.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, सिडकोकडून विक्री केलेल्या घरांसाठी दोन वर्षांसाठी देखभाल दुरुस्ती शुल्क घेतले जाते. या निधीतून इमारत देखभाल, पाणी, वीज, लिफ्टची देखभाल दुरुस्ती केली जाते. सामायिक जागेतील वीज व पाणी बिल, तसेच सुरक्षा खर्चासाठी घेतलेली आगाऊ रक्कम सोसायटी स्थापन झाल्यानंतर त्या सोसायटीकडे वर्ग केली जाते. तसेच ५१ टक्के रहिवासी तयार झाल्यास सोसायटी नोंदणी करून देण्याचा सिडकोचा प्रयत्न असून त्यानंतर देखभाल दुरुस्तीची जबाबदारी संबंधित सोसायटीकडे दिली जाते, असे राज्यमंत्री श्रीमती मिसाळ यांनी सांगितले.

राज्यमंत्री श्रीमती मिसाळ म्हणाल्या, सिडकोच्या घरांच्या प्रश्नासंदर्भात सर्व संबधित सदस्यांसमवेत बैठक घेतली जाईल. तसेच या घरांच्या मालमत्ता कराबाबतचा विषय न्यायालयात प्रलंबित असून न्यायालयाच्या निर्णयानुसार कार्यवाही केली जाईल, असेही त्यांनी सांगितले.

# पुणे महोत्सव खऱ्या अर्थाने भारतीय विचार, संवाद आणि संस्कृतीचा महोत्सव - केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ

## फर्ग्युसन महाविद्यालय येथे १३ ते २१ डिसेंबरदरम्यान आयोजित पुणे पुस्तक महोत्सवाचे उद्घाटन

**पुणे, दि. १५ :** पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा वाढता प्रतिसाद पाहता येत्या काळात पुणे ही पुस्तकाची राजधानी करण्यासाठी प्रयत्न करणार असून पुढील वर्षी हा महोत्सव जागतिक पुस्तक महोत्सव म्हणून आयोजित करण्याचा मानस असल्याचे प्रतिपादन राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी केले.

नॅशनल बुक ट्रस्टच्यावतीने फर्ग्युसन महाविद्यालय येथे आयोजित तिसऱ्या पुणे पुस्तक महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी केंद्रीय सहकार राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु सुरेश गोसावी, ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष लेखक विश्वास पाटील, नॅशनल बुक ट्रस्टचे अध्यक्ष मिलिंद मराठे, ,पुणे पुस्तक महोत्सवाचे मुख्य संयोजक राजेश पांडे, डेक्कन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष प्रमोद रावत, पुस्तक महोत्सव संयोजन समितीचे सदस्य, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, विद्यार्थी उपस्थित होते.

पहिल्या पुस्तक महोत्सवात सुमारे ११ कोटी रुपये, दुसऱ्या वर्षी ४० कोटी रुपयांची पुस्तक विक्रीद्वारे या पुस्तक महोत्सवाला प्रतिसाद वाढत असल्याचे सांगून श्री. पाटील म्हणाले, जगाची पुस्तकाची राजधानी पुणे व्हावी, याकरिता या वर्षीच्या जागतिक पातळीवर होणाऱ्या पुस्तकासंबंधित उपक्रमात पुणे पुस्तक महोत्सवाने सहभाग घेतला आहे. या उपक्रमाचे युनेस्कोमार्फत मूल्यमापन करण्यात येत आहे, त्यामुळे जागतिक पुस्तकाची राजधानी पुणे व्हावी याकरिता अधिकाधिक नागरिकांनी या महोत्सवाला भेट द्यावी. असे झाल्यास पुढच्या वर्षी पुणे पुस्तक महोत्सव हा जागतिक पुस्तक महोत्सव म्हणून आयोजन करण्यात येईल, या माध्यमातून जागतिक पातळीवरील प्रकाशक, लेखक या ठिकाणी येतील.

पुस्तक वाचनाचा आनंद मोठा असतो त्यामुळे ई-बुकच्या युगात पुस्तकाचे वाचन सुरुच राहील. मातृभाषा मराठी भाषेचा अभिमान वाटेल अशी भाषा आहे, देशात सुमारे १२ कोटी मराठी भाषिक आहेत, अशा मराठी भाषेला प्रोत्साहन देण्यासाठी मराठी नाटक व चित्रपट पहावेत,



साहित्याचे वाचन करावे, गीत ऐकावे, असे आवाहन श्री. पाटील यांनी केले.

श्री. मोहोळ म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाला मागील दोन वर्षात वाचकांची मोठया प्रमाणात उपस्थिती, पुस्तकाची विक्रमी विक्री, साहित्य महोत्सवाच्या माध्यमातून विद्वतापूर्ण आणि वैचारिक मंथन घडवून आणणाऱ्या चर्चासत्राचे आयोजन तसेच विविध जागतिक विक्रम झाले असल्याने हा महोत्सव पुस्तक खरेदीचा महोत्सव न राहता खऱ्या अर्थाने भारतीय विचार, संवाद आणि संस्कृतीचा महोत्सव म्हणून ओळखला जात आहे. ते पुढे म्हणाले, येथे देश विदेशातील विविध भाषेतील पुस्तके उपलब्ध आहेत, याचाच अर्थ पुणे हे साहित्य, कला, संस्कृती याच मानबिंदू असलेले शहर म्हणून ओळख आहे. या महोत्सवाकडे वाचन संस्कृतीला समृद्ध करण्याचे व्यासपीठ म्हणून बघितले जात असून पुणेकरांच्या मनात या महोत्सवाबद्दल आपुलकी निर्माण झाली आहे. अभिजात मराठी भाषासह सर्व भारतीय भाषेचे संवर्धन, नवोदित लेखकांना व्यासपीठ तसेच सर्व वयोगटात वाचन संस्कृती रुजविण्याचे काम या महोत्सवाने केले आहे. पुणे शहर हे ज्ञानाची, विचाराची आणि सांस्कृतिक परंपरेची नगरी असून या परंपरेला साजेसा वाचन महोत्सव पुणेकरांनी मनापासून स्वीकारला आहे, असेही ते म्हणाले.

या महोत्सवाच्या माध्यमातून भारतीय भाषेचे अनुवाद, साहित्यिकांच्या विचाराचे आदानप्रदान चालना, वैविध्यपूर्ण भारतीय साहित्य, संस्कृती आंतरराष्ट्रीय वाचकांपर्यंत पोहोचविण्यास मदत होईल, येत्या काळात पुण्याला पुस्तकाची राजधानीचा दर्जा मिकण्यास मदत होईल तसेच दिल्ली येथे आयोजित आंतरराष्ट्रीय पुस्तक महोत्सवाच्या धर्तीवर पुढच्या वर्षी पुणे पुस्तक महोत्सवाचे आयोजन होईल, अशा विश्वास श्री. मोहोळ यांनी व्यक्त केला. विश्वास पाटील म्हणाले, दिल्ली आणि कलकत्ता येथील पुस्तक महोत्सवाप्रमाणे पुणे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. हा भव्य महोत्सव आयोजन केल्याबद्दल आयोजकांचे अभिनंदन करुन येत्या काळात पुणे ही पुस्तकाची राजधानी होण्यास मदत होईल, असेही श्री. पाटील म्हणाले.

पुणे पुस्तक महोत्सवामध्ये सुमारे ७५० हून अधिक पुस्तकाचे दालन आहेत. पुणे साहित्य महोत्सवात साहित्यक, कलाकार आदी सहभागी होणार आहेt असे सांगून श्री. मराठे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाच्या धर्तीवर उपराजधानी नागपूर येथे पुस्तक महोत्सव आयोजित करण्यात आला. येत्या काळात गोवा येथे पुस्तक महोत्सवाचे आयोजन करण्यात येणार आहे. वाचन संस्कृतीची चळवळ अशीच अखंडपणे पुढे चालत राहावी याकरीता प्रयत्न करणार आहोत. असेही ते म्हणाले.

श्री. पांडे म्हणाले, पुणे पुस्तक महोत्सवाला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद लक्षात घेता हा 'पुणेकरांचा उत्सव' झालेला आहे. पुणे ही सांस्कृतिक राजधानी म्हणून ओळखली जाते; परंतु पुढच्या वर्षी पुणे ही पुस्तकाची जागतिक राजधानी म्हणून ओळख निर्माण करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. पुणे साहित्य महोत्सवाचे १६ डिसेंबर पासून आयोजन करण्यात येणार असून सुमारे १५० हून अधिक नामवंत व्यक्ती सहभागी होणार आहेत, असेही श्री. पांडे म्हणाले. यावेळी विश्वास पाटील लिखित 'लस्ट फॉर मुंबई' या कांदबरीचे अनावरण करण्यात आले. कार्यक्रमानंतर मान्यवरांनी पुणे पुस्तक महोत्सवातील विविध दालनाला भेट देऊन विविध पुस्तकाविषयी माहिती घेतली.

# सिडकोच्या घरांच्या किमतीत १० टक्के कपात

**नागपूर, दि. १५ :** नवी मुंबईतील सिडकोच्या वेगवेगळ्या प्रवर्गातील घरांसाठी सिडकोने जे दर निश्चित केले होते त्यामध्ये थेट १० टक्के कपात करण्यात येत असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधान परिषदेत निवेदनाद्वारे केली. या निर्णयामुळे आता ही घरे पूर्वीपेक्षा स्वस्त दरात उपलब्ध होणार असून नवी मुंबई परिसरात घर घेण्याचे सर्वसामान्यांचे स्वप्न आता अधिक सुकर होणार आहे.



**१७ हजार घरांची लॉटरी लवकरच**

यासंदर्भात निवेदन करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, सिडकोतर्फे नवी मुंबईतील खारघर, वाशी, खारकोपर, तळोजा, उलवे, कळंबोली, कामोठे आणि पनवेल या परिसरात तब्बल १७ हजार घरे बांधण्यात आली आहेत. या घरांसाठीची लॉटरी प्रक्रिया येत्या दोन महिन्यांत पूर्ण केली जाणार आहे. त्यापूर्वी सर्वसामान्यांना दिलासा देण्यासाठी घरांच्या किमती कमी करण्याचा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले. ईडब्ल्यूएस आणि एलआयजी या प्रवर्गातील घरांच्या किमती १० टक्के कमी होतील.

या संदर्भात माहिती देताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सर्वांसाठी घरे या संकल्पनेला बळ देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे सर्वसामान्य नागरिकांना परवडणाऱ्या दरात अधिकृत आणि चांगल्या दर्जाची घरे मिळणे शक्य होणार आहेत.

# मुंबई झोपडपट्टीमुक्तीसाठी राज्य शासनाचे मोठे पाऊल

### मुंबईत ५० एकरपेक्षा मोठ्या भूखंडांवर राबवणार 'क्लस्टर रिडेव्हलपमेंट' | उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची विधान परिषदेत घोषणा

**नागपूर, दि. १५ :** मुंबईतील झोपडपट्टी पुनर्विकास प्रकल्पामधील लाभार्थ्यांना दिलासा देणाऱ्या अनेक महत्वपूर्ण घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत केल्या. त्यामध्ये प्रामुख्याने मुंबईला झोपडपट्टीमुक्त करण्यासाठी १७ ठिकाणी एसआरए समुह पुनर्विकास प्रकल्पाच्या घोषणेसोबतच 'एसआरए अभय योजने'ला डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ, तक्रारींच्या जलद निपटाऱ्यासाठी 'एपेक्स ग्रीव्हन्स रिड्रेसल कमिटींची संख्या वाढविण्याच्या घोषणांचा समावेश आहे. त्याचबरोबर म्हाडाच्या ओसीसाठीच्या अभय योजनेला एक वर्षाची मुदतवाढ आणि मुंबई महापालिकेच्या लिज प्लॉटवरील महापालिका कर्मचाऱ्यांनी बांधलेल्या घरांकरीता नवीन योजना करण्याची घोषणा देखील त्यांनी केली.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे झोपडपट्टी पुनर्विकास योजना करण्यात आली आहे. योजनेच्या पहिल्या टप्प्यात मुंबईतील अँटॉप हिल, कृष्ण नगर आणि केतकीपाडा (बोरिवली), गोपीकृष्ण नगर (दहिसर),ओशिवरा, गोवंडी, चित्ता कॅम्प (ट्रॉम्बे), चेंबूर, टागोर नगर (विक्रोळी), विक्रोळी पार्कसाईट, भांडुप या १७ प्रमुख ठिकाणांची निवड करण्यात आली आहे. यामुळे मुंबईतील लाखो झोपडपट्टीवासीयांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यासंदर्भात निवेदन करताना उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबईतील ५० एकर किंवा त्यापेक्षा मोठ्या खासगी, शासकीय किंवा निमशासकीय जमिनींवर आता एकत्रितपणे पुनर्विकास केला जाणार आहे. छोट्या-छोट्या एसआरए प्रकल्पांऐवजी आता संपूर्ण परिसराचा कायापालट करण्यासाठी ही योजना राबवली जाईल. या महत्त्वाकांक्षी योजनेला राज्य मंत्रिमंडळाने ७ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यता दिली असून, १३ नोव्हेंबर २०२५ रोजी याबाबतचा शासन निर्णयही जारी करण्यात आला असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

हे प्रकल्प रखडू नयेत आणि जलदगतीने पूर्ण व्हावेत, यासाठी राज्य शासनाने पुढाकार घेतला असून एमएमआरडीए, सिडको, एमआयडीसी, एमएसआरडीसी, म्हाडा आणि मुंबई महानगरपालिका या शासकीय संस्थांच्या मदतीने 'जॉइंट व्हेंचर' तत्त्वावर हे प्रकल्प उभारले जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात आणखी काही प्रकल्प हाती घेतले जाणार असून त्यामुळे मुंबईचा चेहरामोहरा बदलण्यास आणि सुनियोजित शहरे वसण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

**एसआरए अभय योजने'ला**
**३१ डिसेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ**

मुंबईतील हजारो झोपडीधारकांसाठी दिलासा देताना उपमुख्यमंत्री शिंदे यांनी झोपडी खरेदी-विक्रीच्या तांत्रिक अडचणीत अडकलेल्या नागरिकांसाठी 'एसआरए अभय योजने'ची मुदत आता डिसेंबर २०२६ पर्यंत वाढविण्याची घोषणा केली. अनेक झोपडीधारकांनी आपल्या झोपड्यांची खरेदी-विक्री किंवा हस्तांतरण केले होते. मात्र, नियमानुसार या नवीन झोपडीधारकांचे नाव 'अंतिम परिशिष्ट-२' मध्ये (पात्र झोपडीधारकांच्या यादीत) समाविष्ट करण्याची कोणतीही तरतूद नव्हती. यामुळे हजारो गरीब कुटुंब हक्काच्या घरापासून वंचित राहण्याची भीती निर्माण झाली होती.

# राज्यातील विद्यापीठांतील प्राध्यापक पदभरतीचा मार्ग मोकळा - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील

**नागपूर, दि. १५ :** राज्यातील विद्यापीठांमधील रखडलेल्या प्राध्यापक पदभरतीच्या प्रक्रियेस गती मिळाली असून गुणवत्तेच्या आधारे 60:40 या प्रमाणात भरती करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी विधानपरिषदेत दिली.



विधानपरिषद सदस्य डॉ. प्रज्ञा सातव यांनी प्राध्यापक पदभरतीबाबत प्रश्न उपस्थित केला होता. यावेळी सदस्य विक्रम काळे यांनी चर्चेत सहभाग घेतला. या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री चंद्रकांत पाटील बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पाटील म्हणाले, राज्यातील विद्यापीठांमध्ये प्राध्यापकांची मोठ्या प्रमाणावर पदे रिक्त असून, या पदभरती मागील दोन वर्षांपासून विविध कारणांमुळे प्रक्रिया रखडली होती. राज्यपालांच्या अधिकार व सूचनांनुसार भरती प्रक्रिया राबविण्यात येत असून, गुणवत्तेच्या निकषांवर आधारित 60:40 हे सूत्र निश्चित करण्यात आले आहे.

या सूत्रानुसार उमेदवारांची शैक्षणिक पात्रता, पीएच.डी., संशोधन लेख, अनुभव यावर आधारित गुणांकन करण्यात येणार आहे. तसेच मुलाखत समितीमार्फत आणि विद्यार्थ्यांच्या सहभागातून अध्यापन कौशल्याचे मूल्यमापन करण्याची तरतूद ठेवण्यात आली आहे. यापूर्वी 80:20, 50:50 अशा विविध प्रस्तावांवर चर्चा झाली होती; मात्र आता अंतिमतः 60:40 हे प्रमाण लागू करण्याचा निर्णय झाला आहे.प्राध्यापकांच्या भरतीसाठी नव्या निर्णयाचा सविस्तर अभ्यास करून पुढील दोन-तीन दिवसांत कायदेशीर व प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे मंत्री पाटील यांनी यावेळी सांगितले.

प्राध्यापक भरतीतील ६०:४० गुणप्रणाली म्हणजे एकूण गुणांपैकी ६० टक्के गुण हे शैक्षणिक पात्रता, अध्यापन अनुभव आणि संशोधनासाठी असतील आणि ४० टक्के गुण हे मुलाखतीसाठी असतील.

# कोल्हापुरी चपलांच्या जागतिक प्रसारासाठी प्राडा, लिडकॉम आणि लिडकार यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई, दि. १५ :** भारतीय पारंपरिक चर्मकला कोल्हापुरी चपलांचा वारसा जगभर पोहोचवण्यासाठी जागतिक ब्रॅन्ड प्राडा, लिडकॉम (संत रोहिदास चर्मउद्योग आणि चर्मकार विकास महामंडळ) आणि लिडकार (डॉ. बाबू जगजीवनराम चर्मउद्योग विकास महामंडळ) यांच्यात सामंजस्य करार झाला. मुंबईतील इटालियन वाणिज्य दूतावासात, इटली–भारत व्यापारी परिषदेनिमित्त या करारावर स्वाक्षरी करण्यात आली.

शतकांपासून वापरात असलेल्या पारंपरिक चप्पल निर्मितीच्या पद्धती, प्राडाच्या आधुनिक व समकालीन डिझाईन शैली या माध्यमातून चप्पल विकसित केल्या जात आहेत. पारंपरिक कौशल्य आणि आधुनिक लक्झरी फॅशनच्या मदतीने पारंपारिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ मिळणार आहे. विशेष चप्पला फेब्रुवारी २०२६ मध्ये प्राडाच्या ४० विक्री केंद्रांमध्ये तसेच अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

या उपक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचे ठोस पाठबळ लाभले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, सामाजिक न्याय राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांचे सक्रिय मार्गदर्शन मिळाले आहे. हा करार प्रधान सचिव तथा लिडकॉमचे अध्यक्ष डॉ. हर्षदीप कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार यांच्या धोरणात्मक नियोजनामुळे शक्य झाला आहे.



**पारंपारिक कोल्हापुरी कौशल्याला प्राडाची आधुनिक साथ**

सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट म्हणाले, या कराराने भारतातील अनेक कारागीर, व्यावसायिक आणि उद्योजकांचा फायदा होणार आहे. या विशेष संकलनातून भारतीय कारागिरांच्या कलेला नवी दिशा मिळणार असून आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांच्या कौशल्याची ओळख अधिक दृढ होणार आहे.

लिडकॉमच्या व्यवस्थापकीय संचालक प्रेरणा देशभ्रतार म्हणाल्या, पारंपरिक कला जपणाऱ्या कारागिरांच्या पिढ्यांचा सन्मान करण्यासाठी आणि त्यांच्या कौशल्याला जागतिक पातळीवर योग्य ओळख देण्यासाठी ही भागीदारी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. यात एक जागतिक ब्रँड थेट महाराष्ट्र आणि कर्नाटकातील कारागिरांसोबत काम करत असल्याने त्यांच्या या कौशल्याला एक ओळख मिळेल आणि कलेचे पूर्ण श्रेय या कारागिरांना मिळेल.

लिडकारच्या व्यवस्थापकीय संचालिका डॉ. के. एम. वसुंधरा म्हणाल्या, कोल्हापुरी चपलांची परंपरा म्हणजे महाराष्ट्र–कर्नाटकातील चप्पलकारांचे शतकांपासूनचे संचित कौशल्य या सहकार्यामुळे प्रशिक्षण, रोजगार आणि जागतिक संधींची विस्तृत दारे उघडणार आहेत.

प्राडा समूहाच्या सामाजिक उत्तरदायित्व विभागाचे प्रमुख लॉरेंझो बर्टेली म्हणाले, ही भागीदारी म्हणजे सांस्कृतिक आदानप्रदानाची नवी ओळख आहे. भारतीय कारागिरांच्या अतुलनीय कलेला आधुनिक जगात योग्य स्थान देण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

चपलांच्या कलेक्शनच्या माध्यमातून भारतीय कारागिरीचा 'प्राडा मेड इन इंडिया- इन्स्पायर्ड बाय कोल्हापुरी चप्पल्स' प्रकल्पाचा आराखडा, अंमलबजावणी आणि त्या संदर्भातील मार्गदर्शक तत्वे या करारात नमूद करण्यात आली आहेत. महाराष्ट्र आणि कर्नाटकातील पारंपरिक कोल्हापुरी चपला तयार करणाऱ्या कुशल कारागिरांच्या साह्याने या चपला भारतात बनवल्या जातील. या चपला बनवण्याच्या पारंपरिक पद्धती आणि प्राडाच्या समकालीन डिझाइन्स तसेच प्रीमिअम दर्जाच्या मटेरिअलच्या साह्याने या कलेक्शनच्या माध्यमातून भारतातील संपन्न वारसा आणि आधुनिक लक्झ्यरी फॅशनची अभिव्यक्ती यात एका नव्या संवादाला सुरुवात केली जाणार आहे.

पारंपरिक कोल्हापुरी चपला महाराष्ट्रातील चार जिल्हे (कोल्हापूर, सांगली, सातारा, सोलापूर) आणि कर्नाटकातील चार जिल्हे (बेळगावी, बागलकोट, धारवाड, बिजापूर). या आठ जिल्ह्यांमध्ये बनवल्या जातात. २०१९ मध्ये कोल्हापुरी चपलांना जिओग्राफिकल इंडिकेशन (जीआय) टॅग देण्यात आल्याने त्यांची अस्सलता जपली गेली आणि त्यांचे सांस्कृतिक महत्त्व अधोरेखित झाले.

## महावितरणने एका झटक्यात फेडले
# १२,८०० कोटींचे कर्ज

**मुंबई, दि. १५ :**देशातील सर्वात मोठी वीज वितरण कंपनी असलेल्या महावितरणने स्टेट बँक ऑफ इंडियाच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतीपूर्वी एकाच हफ्त्यात नुकतीच परतफेड केली. अन्य वित्तीय संस्थेकडून कमी व्याज दराचे कर्ज उभारून तसेच स्वनिधीतून ही परतफेड केली असून त्यामुळे व्याजाच्या रकमेत मोठी बचत होईल, अशी माहिती अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी दिली.

मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम करण्याची सूचना केली असून त्यादृष्टीने कंपनीवरील कर्जाचा बोजा हलका करण्यासाठी यशस्वी पावले टाकण्यात आली.

महावितरणने विविध टप्प्यांवर स्टेट बँकेकडून एकूण १२,८०० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यासाठी ८.६५ टक्के ते ९.२५ टक्के दराने व्याज द्यावे लागत होते. त्याऐवजी अन्य वित्तीय संस्थेकडून ७,१०० कोटी रुपये कर्ज ८.२५ टक्के इतक्या कमी व्याजदराने उभारून महावितरणने स्टेट बँकेचे ७,१०० कोटी रुपयांचे कर्ज फेडले. त्या खेरीज महावितरणने स्वनिधीतून ५,६३४ कोटी रुपयांचे स्टेट बँकेचे कर्ज फेडले.

महावितरणने स्टेट बँकेचे कर्ज घेताना आपल्या दहा सर्कलमधील महसूल तारण म्हणून ठेवला होता. या सर्कलमध्ये वार्षिक तीस हजार कोटी रुपयांचा महसूल आहे. स्टेट बँकेचे सर्व कर्ज फेडल्यामुळे हा महसूल तारणमुक्त होईल. त्या आधारे कंपनीला ५०,००० कोटी रुपयांपर्यंतचा निधी माफक व्याजदरात कर्जरुपाने उभा करता येईल.

महावितरणची पत वाढविणारे पाऊल - महावितरणने एकाच हफ्त्यात स्टेट बँकेच्या १२,८०० कोटी रुपयांच्या कर्जाची मुदतपूर्व परतफेड करण्यामुळे कंपनीची वित्तीय बाजारातील पत वाढली आहे. ही घडामोड गुंतवणूकदारांचा विश्वास वाढविणारी आहे. कंपनीसाठी भविष्यात खासगी किंवा सार्वजनिक बाँड उभारायचे झाल्यास त्यासाठीही इतक्या मोठ्या कर्जाची परतफेड करणे उपयुक्त ठरणारे आहे.

आगामी काळात महावितरणला शेअर बाजारात सूचिबद्ध करण्याच्या दृष्टीनेही ही कर्जाची परतफेड महत्त्वाची आहे.

